ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वर्गणीचे दर :

वार्षिक : ६ रु.

सहामाही : ३ रु.

किरकोळ : १२ नये पैसे

दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख २३ सप्टेंबर, १९५९

## विविध माहिती

**निराश्रितांना रात्रीचा आश्रय**—मध्यवर्ती समाज-हित-संवर्धन बोर्डातर्फे देशाच्या निरनिराळ्या भागांत निराश्रितांची झोपण्याची सोय करण्यासाठी १०० आश्रयस्थानें बांधण्यांत येणार आहेत. गुजरातमधील अहमदाबाद, बडोदा, सुरत, इत्यादि शहरांतून अशीं ठिकाणें बांधण्यांत येणार आहेत. मोठ्या शहरांतून पदपथावर वस्ती करणाऱ्या लोकांना ह्या आसऱ्याचा चांगला उपयोग होईल.

**अणुशक्तीच्या साह्यानें वीज**—भारताच्या अणुशक्ति मंडळाचे अध्यक्ष डॉ. भाभा ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं अणुशक्तीच्या साह्यानें वीज निर्माण करणें भारताच्या आवाक्या-बाहेरचें नाहीं. वीज निर्माण करण्याचीं नेहमींचीं साधनें भारताजवळ मर्यादित प्रमाणांत असलीं तरी अणुशक्तीसाठी लागणारें खनिज विपुल प्रमाणांत आहे, असें त्यांचें म्हणणें आहे.

**भिलई कारखान्याकडे मागणी**—भिलई येथील पोलादाच्या कारखान्याकडे दोन परदेशीय कारखान्यांनीं ३५,००० टन अशुद्ध लोखंडाची मागणी केली आहे. त्यांपैकी २०,००० टनांची मागणी एका जपानी कारखान्याकडून आली आहे. कारखान्या-मधून लोखंडाची निर्यात नुकतीच होऊं लागली आहे. ४,००० टन अशुद्ध लोखंड कांहीं दिवसांपूर्वी निर्यात करण्यांत आलें.

**परदेशीय नागरिकांची फसवणूक**—भारतांत येणाऱ्या परदेशीयांची फसवणूक केल्याबद्दल भारत सरकारकडे बऱ्याच तक्रारी आल्या आहेत. गंडेदोरे, ताईत, इत्यादि वस्तु पुरवणाऱ्या कांहीं कंपन्यांनीं व व्यक्तींनीं ही फसवणूक केलेली आढळली. त्याशिवाय बक्षिसाच्या खोट्या स्पर्धा जाहीर करूनहि फसवणूक करण्यांत आलेली आढळली.

**पूर्व-पाकिस्तानमधील जलमार्ग**—पूर्व पाकिस्तानांतील जलमार्गावर वाहतूक करणाऱ्या छोट्या पडावांना अधिक चांगलें मार्गदर्शन करण्याची योजना आखण्यांत आली आहे. ह्या योजनेसाठी अमेरिकन सरकार पाकिस्तानला १७,५०,००० डॉलर्सचें कर्ज देणार आहे. ह्यासंबंधीच्या करारावर उभय सरकारांच्या प्रतिनिधींनीं ढाका येथें नुकत्याच सह्या केल्या.

**हिंदी कादंबरीकाराचा सन्मान**—श्री. शर्मा कादंबरीकाराच्या 'झांसी की रानी' ह्या कादंबरीचें भाषेंत भाषांतर करण्यांत आलें आहे. भाषांतराची एव श्री. शर्मा ह्यांच्या वाङ्मयीन कामगिरीचें कौतुक कर रशिअन वकिलातीकडून श्री. शर्मा ह्यांना आलें आहे. आवृत्ति ३५० पानांची असून तींत बरींच चित्रेंहि आहेत.

**सिंधु नदीच्या खोऱ्याचा विकास**—भारत व ह्यांच्यामध्यें चालू असलेली कालव्याच्या पाण्याबद्दल यशस्वी झाल्यावर सिंधु नदीच्या खोऱ्याचा विकास क पश्चिम जर्मनीकडून बरीच मोठी आर्थिक मदत मिळण्य आहे. ह्या बाबतींत जागतिक बँक व पश्चिम जर्म ह्यांच्यांत वाटाघाटी चालू आहेत.

**हिंदी सागराचें संशोधन**—भारताच्या पश्चिम कि हिंदी सागराचें संशोधन करण्याच्या कामीं ब्रिटन, अमेरिका, फ्रान्स, ऑस्ट्रेलिआ, इत्यादि देश सहकार्य आहेत. भारतहि दोन बोटी ह्या कामीं देणार आहे. हि हा हवामानांतील बदलाच्या दृष्टीनें व समुद्रांतर्गत प्राणि दृष्टीनें विशेष अभ्यासनीय आहे असें तज्ज्ञांचें मत आ

**जपानमधील सहकारी शेती**—बिहार राज्याचे मंत्री श्री. जगन्नारायण लाल हे जपानला जाऊ हिरोशिमा येथें भरलेल्या जागतिक शांतता परिषदेसाठी प्रतिनिधि मंडळाचे नेते म्हणून ते गेले होते. त्यांनीं जपानमधील वास्तव्यांत जपानी सहकारी शेतीचें निरीक्ष त्यांच्या मतानें जपानांत सहकारी शेती यशस्वी झालेल

**सयामच्या सरकारला जमीन दिली**—बिहारच्या बुद्धगया येथील कांहीं जमीन सयामच्या सरकारला दी च्या भाडेपट्ट्यानें देण्याचें ठरविलें आहे. गया येथी मठाला जाण्यास चांगला रस्ता करण्यासाठी जमिनीचा करण्यांत येणार आहे. सयामच्या सरकारला ह्या ज अवघे २५ रुपये सालीना द्यावे लागतील

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**रायचूरजवळ साखरेचा कारखाना**—मुंबईच्या किलाचंद देवचंद कंपनीला म्हैसूर राज्यांत एक साखरेचा कारखाना काढण्याची परवानगी देण्यांत यावी, अशी शिफारस म्हैसूर सरकारनें केली आहे. संकल्पित कारखाना रायचूरजवळ निघण्याचा संभव असून त्यासाठी सुमारें एक कोटी रुपये भांडवल लागेल. कंपनीच्या तज्ज्ञांनीं जागेची पाहणी केली आहे.

**बंगाली पुस्तकाची प्रशंसा**—बंगालमधील जीवनाची सध्यांची परिस्थिति चित्रित करणाऱ्या एका पुस्तकाचें प्रकाशन अमेरिकेंत करण्यांत आलें आहे. ह्या पुस्तकांत बंगाली भाषेंतील कांहीं कवितांचीं व गोष्टींचीं इंग्रजी भाषांतरें ग्रथित करण्यांत आलीं आहेत. न्यूयॉर्क हेरल्ड ट्रायब्यून ह्या दैनिकानें पुस्तकाची प्रशंसा केली आहे.


**ऑक्सफर्डच्या शब्दकोशाला बंदी**—पाकिस्तानच्या सरकारनें कन्साइज ऑक्सफर्ड डिक्सनरीच्या १९५८ च्या चौथ्या आवृत्तीला बंदी केली आहे. ह्या आवृत्तींत पाकिस्तानचें वर्णन करतांना 'भारतामधील एक स्वतंत्र राज्य; १९४७ पासून स्वतंत्र मुसलमानी राज्य' असें म्हटलें आहे. ह्या शब्दकोशाच्या हजारों प्रती पाकिस्तानांत ह्यापूर्वीच प्रसारित झाल्या आहेत.

**प्रवासांत झोपण्याची सोय**—रेल्वेनें ५०० मैलांपेक्षा अधिक प्रवास करणाऱ्या तिसऱ्या वर्गाच्या उतारूंसाठी रेल्वे-अधिकारी नवीन डबे जोडणार आहेत. फक्त वेगानें जाणाऱ्या कांहीं निवडक गाड्यांनाच ते जोडण्यांत येतील. एका डब्यांत ७६ उतारूंना झोपण्याचीं बाकें असतील. ह्या सोयीसाठी त्यांच्याकडून जादा आकार घेण्यांत येणार नाहीं.

**बसच्या स्टेशनची इमारत**—सौराष्ट्र स्टेट ट्रॅन्सपोर्ट कॉर्पोरेशनच्या मध्यवर्ती स्टेशनच्या इमारतीचें राजकोट येथें उद्घाटन करण्यांत आलें. ह्या इमारतीसाठी ६ लाख रुपये खर्च आलेला आहे. इमारतीपैकीं कांहीं भाग बांधतांना कॉर्पोरेशनच्या नोकरांनीं श्रमदान केलें होतें. कॉर्पोरेशनच्या मालकीच्या २५३ बसेस आहेत.

**बसनें रात्रीच्या प्रवासाची सोय**—मद्रास स्टेट ट्रॅन्सपोर्ट संघटना जलद प्रवास करणाऱ्या रात्रीच्या मोटारी सोडण्याचा विचार करीत आहे. ह्या मोटारी फक्त लांबवर प्रवास असणाऱ्या मार्गांवरच रात्रीची वाहतूक करतील. मद्रास–बंगलोर, मद्रास–तिरुचिरापल्ली, पाँडिचरी–बंगलोर, इत्यादि मार्गांवर त्या प्रथम धावूं लागतील.


किर्लोस्कर
स्थापना १८८८
पावरवर चालणारा
उंसाचा चरक



कमी वेळेंत जास्तीत जास्त उसाचे गाळण करण्यासाठीं शेतकरी किर्लोस्कर चरकाचीच निवड करतात. रोलर्स, गिअर्स इत्यादी सर्व भाग उत्कृष्ट पोलाद, ओतीव लोखंड व गनमेटलपासून तयार केलेले असून वर्षानुवर्षें बिनतक्रार काम देण्याच्या दृष्टीनेंच त्यांची रचना केलेली असते. बैलाकडून चालणारेहि चरक तयार होतात.

किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी ( द. सातारा )



# ✻ दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड ✻

( शिड्यूल्ड बँक )

| हेड ऑफिस :–१० बुधवार पेठ, पुणें २ | अध्यक्ष | मुंबई शाखा :–८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १ |
| --- | --- | --- |
| प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन ६५६३ ) | श्री. ग. रा. साठे | कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन २५३४०८ ) |

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३०,४९०
खेळतें भांडवल ... ... रु. ५६,००,०००

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १½% टक्के ★ मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल्. बी. मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. १३ सप्टेंबर, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कापडाच्या गिरण्यांचें आधुनिकीकरण

हिंदमधील कापडाच्या गिरण्यांची यंत्रसामग्री आधुनिक पद्धतीची करण्याविषयींच्या महत्त्वाच्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी टेक्स्टाइल कमिशनर श्री. डी. एस्. जोशी हे इटली, स्वित्झरलंड व ब्रिटनच्या दौऱ्यावर जात आहेत. भारत सरकारचे औद्योगिक सल्लागार श्री. मुजुमदार हेहि त्यांच्याबरोबर जात आहेत. हा दौरा नॅशनल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनतर्फे आंखण्यांत आलेला आहे. कॉर्पोरेशननें ह्या प्रश्नाबाबत जो अभ्यास-गट स्थापन केला आहे, त्याला मदत करण्याचें काम वरील अधिकाऱ्यांनीं करावयाचें आहे. देशांतील कापडाच्या गिरण्यांची यंत्रसामग्री अगदीं अद्यावत् करून घेण्यासाठी काय उपाय योजावे ते त्यांनीं सुचवावयाचे आहेत. अभ्यासगटांतील आणखी दोन सभासद ह्या आधींच युरोपांत गेले आहेत. युरोपमधील आधुनिक पद्धतीच्या कापडाच्या गिरण्या कशा चालतात ह्याचा अभ्यासहि गट करणार आहे. भारतामधील गिरण्यांत अद्यावत् पद्धतीची यंत्रसामुग्री बसवावयाची झाल्यास त्यासाठी किती खर्च येईल, त्यांपैकी किती खर्च परदेशी चलनाच्या रूपांत करावा लागेल आणि खुद्द कापडगिरण्याच किती पैसा उभारूं शकतील, इत्यादि प्रश्नांची तपासणी अभ्यासगटानें करावयाची आहे. भारतामधील बहुतेक कापड गिरण्यांची यंत्रसामग्री ४० वर्षांची जुनी आहे. ती सर्व बदलावयाची म्हटलें तर कोट्यवधि रुपये लागतील. पण आहे त्या यंत्रसामग्रींत सुधारणा करावयाची झाली तरीसुद्धां तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ८० कोटी रुपये लागतील असा अंदाज करण्यांत आला आहे. कापडधंद्याच्या अडचणीच्या परिस्थितीची चौकशी करण्यासाठी टेक्सटाईल इन्कायरी कमिशन नेमण्यांत आलें होतें. कमिशननें केलेल्या अनेक शिफारशींत यंत्रसामग्रीच्या आधुनिकीकरणाची शिफारस महत्त्वाची गणली गेली आहे.

---

## कोंकणांतील छोट्या बंदरांचा विकास

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या उरलेल्या काळांत कोंकणांतील छोट्या बंदरांचा विकास करण्याचें काम हातीं घेण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. ह्या कामासाठी ४० लाख रु. खर्च करण्यांत यावयाचे आहेत. ह्या रकमेपैकी ६,६५,००० रु. एवढी रक्कम चालू आर्थिक वर्षांत खर्ची पडणार आहे. त्याशिवाय कोंकणांतील रस्ते व पूल ह्यांवर ३५ लाख रु. खर्च करण्याचें व मच्छीमारीच्या धंद्याच्या वाढीसाठी व सुधारणेसाठी आणखी २५ लाख रु. खर्च करण्याचें ठरविण्यांत आलें आहे. वेंगुर्ला येथील धक्क्याची वाढ करण्यासाठी १६ लाख रुपयांची रक्कम मंजूर करण्यांत आली आहे. त्यांपैकी ५०,००० रुपयांची रक्कम चालू आर्थिक वर्षांत खर्च करण्यांत येणार आहे. विजयदुर्ग येथील धक्क्याचीहि सुधारणा करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी १८ लाख रु. खर्च करण्यांत येणार आहेत. त्यांपैकी ५०,००० रु. चालू वर्षी खर्च करण्यांत येतील. राजापूरच्या खाडीच्या दोन्ही तीरांना मचवे लागण्यासारखे धक्के बांधण्यांत येणार आहेत. ह्या कामासाठी ७ लाख रु. खर्च करण्यांत येतील. त्यापैकी एक लाख रु. चालू वर्षांत खर्च होणार आहेत. त्याशिवाय देवगड दाभोळ, जयगड, हर्णै, मुरुड, रेवस, इत्यादि बंदरांचीहि सुधारणा करण्याच्या योजना आंखण्यांत आल्या आहेत. कोंकणांतील दारिद्र्याचा व वाहतुकीच्या साधनांचा संबंध नेहमींच जोडण्यांत येतो, आणि कांहीं प्रमाणांत तो खराहि आहे. खुष्कीच्या वाहतुकीच्या साधनांबरोबरच कोंकणच्या किनाऱ्यावरील छोट्या बंदरांचा विकास करण्याचें काम हातीं घेण्यांत येणार असल्यानें कोंकण भागांतील लोकांचें दारिद्र्य नाहींसें करण्याच्या कामांतील एक मोठा अडथळा दूर होणार आहे.

---

## निचरा न झालेल्या पाण्याचा वाढता धोका

दिल्लीमध्यें अलीकडे बांधण्यांत आलेल्या कांहीं मोठ्या इमारतींच्या तळघरांत पाणी सांठल्याचें वर्तमान आहे. जमिनीखाली असणाऱ्या व निचरा न झालेल्या पाण्याची पातळी वाढत चालल्यामुळें असें होत आहे असें तज्ज्ञांचें मत आहे. ह्या प्रकारामुळें एंजिनिअरांच्या पुढें एक नवाच प्रश्न उत्पन्न झाला आहे, आणि विशेषतः पावसाळ्यांत त्याचें गांभीर्य वाढत असतें. पाण्याच्या वाढत्या पातळीवर इलाज म्हणून ट्यूब वेल्स खोदण्याच्या सूचना करण्यांत आलेल्या होत्या. पण ज्या ठिकाणीं हा उपाय करण्यांत आला त्या सर्वच ठिकाणीं तो यशस्वी झालेला आढळून आलेला नाहीं. जमिनीखालील पाण्याचा हा धोका फक्त दिल्ली शहरापुरताच मर्यादित नाहीं. सिंधु नदीच्या खोऱ्यांत सर्वत्रच हा प्रश्न उपस्थित झालेला आहे. अमृतसर आणि लाहोर शहरांतहि हा धोका उत्पन्न झालेला आहे. अमृतसर शहरांत जमिनीखालील पाण्याची पातळी ३० वर्षांपूर्वी ५० फूट खाली होती ती आतां ७ ते ११ फुटांपर्यंत वर चढली आहे. ती अशीच वाढत गेली तर इमारतींना धोका पोंचल्याशिवाय राहणार नाहीं. तथापि हा प्रश्न शहरें व मोठीं गांवें ह्यांच्यापुरताच आहे असें नाहीं. पाण्याचा निचरा न झाल्यामुळें जमीन लागवडीच्या कामीं निरुपयोगी होते. पंजाबच्या कांहीं जिल्ह्यांतील २५ ते ४० टक्के मशागतीची जमीन अशा रीतीनें कुचकामी झाल्याचें समजतें. शेतीला पाणीपुरवठा करणाऱ्या योजना ह्या १०० टक्के गुणकारी ठरतात असें नाहीं, हाच ह्याचा अर्थ आहे. म्हणून नको असलेलें पाणी काढून टाकण्याच्या योजना अंमलांत आणल्या गेल्या पाहिजेत. त्याचप्रमाणें कालव्यांमधील पाणी झिरपून न जावें म्हणूनहि व्यवस्था झाली पाहिजे.

---

## लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशननें दिलेले क्लेम्स

लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशननें १९५८ मध्यें क्लेम्सदाखल २३·७० कोटी रुपये दिले. त्यांपैकी विमेदारांच्या निधनामुळें एकूण ६·३४ कोटी रुपये देण्यांत आले.

## आग्रा येथील गालिचाच्या धंद्याच्या अडचणी

आग्रा येथें सर्व भारतांत प्रसिद्ध असणाऱ्या गालिचांचा उद्योगधंदा चालतो. परंतु ह्या धंद्यावर अलीकडे कांहीं संकटें कोसळूं पहात आहेत. त्यामुळें धंद्याशीं संबंधित असलेल्यांच्या जीवनावरहि एक प्रकारची अवकळा येत चालली आहे. सध्यां धंद्यापुढें दोन अडचणी प्रामुख्यानें आहेत. पहिली अशी कीं, ह्या धंद्यांत काम करणारीं तरबेज माणसें हळुहळु दुर्मिळ होऊं लागलीं आहेत. दुसरी, गालिचांसाठीं लागणाऱ्या रंगांसंबंधींची आहे. लोकर रंगविण्यासाठी लागणारे अनेक रंग ब्रिटन, स्विट्झरलंड आणि जर्मनीकडून आयात करावे लागतात. परंतु सरकारनें त्यांच्या आयातीवर घातलेलीं नियंत्रणें धंद्याला जाचक ठरूं लागलीं आहेत. शिवाय, आयात केलेल्या रंगांच्या किंमतीहि किती तरी पटींनीं वाढल्या आहेत. आणखी एक अडचण म्हणजे लांब धागा निघूं शकणारी पांढरी लोकरहि दुर्मिळ होत चाललेली आहे. अशा प्रकारची लोकर मुख्यतः राजस्थान व उत्तर प्रदेशांतून येते. पण एकूण उत्पादनाच्या ७५ टक्के लोकर निर्यात करण्यांत येत असते. गालिचेवाल्यांनीं मध्यवर्ती सरकारच्या व्यापार व उद्योगखात्यानें जरूर ती लोकर पुरविण्यासाठी एखाद्या कॉर्पोरेशनची स्थापना करावी अशी सूचना केली आहे. धंद्यांतील यंत्रमागावर १४ वर्षांखालील मुलांना काम करण्याची बंदी करण्यांत आलेली आहे. त्यामुळेंहि अडचणी वाढल्या आहेत. ह्या कायद्यामुळें यंत्रमागावर काम करणाऱ्या लोकांची संख्या घटली आहे. दहा वर्षांपूर्वी यंत्रमागावर काम करणारे १,००० तरी कामगार होते. आतां त्यांची संख्या खूपच खालीं आली आहे. गालिचे निर्यात करण्यामुळें भारताला दरसाल सुमारें तीन कोटी रुपयांचें परदेशीय चलन मिळतें. त्या दृष्टीनेंहि धंदा महत्त्वाचा आहे.

## चंद्रलोकावरील यशस्वी प्रयाणाचें महत्त्व

सोव्हिएट रशिआच्या शास्त्रज्ञांनीं व तंत्रज्ञांनीं चंद्रावर जाणारा अग्निबाण सोडण्यांत यश मिळविलें आहे. ह्या यशाचें सर्व देशांत कौतुक करण्यांत येत आहे. चंद्राच्या दिशेनें रशिआनें सोडलेला पहिला अग्निबाण चंद्रापासून सुमारें ४,००० मैलांवरून पुढें गेला व सूर्याच्या ग्रहमालिकेंत सामील झाला. त्याच वेळीं जगांतील अनेक शास्त्रज्ञांनीं रशिआ चंद्रलोकावरील सफर प्रथम करणार, असा अंदाज केला होता. तो आतां खरा ठरला आहे. नुकताच सोडलेला अग्निबाण दर सेकंदाला ७ मैल ह्या वेगानें प्रवास करीत होता. दिल्ली ते मॉस्को हा प्रवास करणाऱ्या टी. यू. १०४ ह्या रशिअन विमानाच्या १५ पट वेग ह्या अग्निबाणाचा होता. रशिअन ॲकेडेमी ऑफ सायन्सेसचे उपाध्यक्ष ह्यासंबंधीं बोलतांना म्हणाले कीं, अग्निबाणांत मनुष्य बसवून तो चंद्रावर उतरविण्याचें काम फारच अवघड आहे. परंतु आतां तें फार काळ लांबणार नाहीं. नवा अग्निबाण चंद्रावर जाऊन आदळला त्या वेळेपर्यंत त्यांत बसविण्यांत आलेलीं उपकरणें चांगलीं काम करीत होतीं. अनंत आकाशांत पहिला पूल बांधण्यांत मनुष्यानें आतां यश मिळविलें आहे. अग्निबाण आपल्या दिशेपासून दुसरीकडे भरकटूं नये म्हणून जी यांत्रिक व्यवस्था करण्यांत आली होती तिनें आपलें काम फारच उत्कृष्ट बजावलें. ब्रिटनमधील प्रसिद्ध शास्त्रज्ञ प्रा. लॉवेल ह्यांनीं रशिआच्या तंत्रविद्येची मुक्तकंठानें स्तुति केली आहे. ते म्हणतात कीं, चंद्रलोकाचें संशोधन करण्यासाठी तेथें पोचणारा अग्निबाण हा सावकाश उतरणारा असला पाहिजे. म्हणजे आंतील उपकरणें धक्क्यानें मोडणार नाहींत आणि चंद्रलोकावरील माहिती देऊं शकतील. तो पुढचा महत्त्वाचा टप्पा आहे.

## दि इचलकरंजी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. इचलकरंजी

चेअरमन : यशवंत विठ्ठल दातार
मॅनेजर : दौलतराव रामजी काळे

मागील वर्षाच्या अखेरीस शेअर भांडवल रु. १,३२,७७५ होतें. या वर्षी रु. १,३५,४२५ आहे. निरनिराळ्या फंडांची एकूण रक्कम रु. २,५३,४३४ होती ती २,८४,५८१ झाली आहे. अशा रीतीनें बँकेचें स्वतःचें भांडवलांत ३३,७९७ रु. नें वाढ झाली आहे. गतसालीं सेव्हिंग्ज ठेव १३,०३,३७६ रु., चालू ठेव ५,९७,३५४ रु., मुदत ठेव ७,६२,६०४ रु. अशा होत्या. त्या सालअखेरीस अनुक्रमें सेव्हिंग्ज ठेव १४,५९,०७४ रु., चालू ठेव ६,६७,८३३ रु., मुदत ठेव ७,८१,३१९ रु. अशा झाल्या आहेत. विशेषतः सेव्हिंग्ज ठेवींच्या रकमेंत विशेष वाढ झाली आहे. गत सालापेक्षा एकूण ठेवींच्या रकमेंत रुपये २,४४,८९२ रु. इतकी वाढ झाली आहे. इचलकरंजीचा व्यापार, उद्योगधंदे सारखे वाढत असलेनें त्या कामीं लागणारे भांडवलाचा पुरवठा बँकेकडून सदैव होत असतो. सदर क्षेत्रांत दिवसेंदिवस बहुसंख्येनें नवीन नवीन लोक पदार्पण करीत असलेनें बँकेकडे सर्व प्रकारच्या खात्यावर रकमांची मागणी बरीच मोठ्या प्रमाणांत आली. त्यामुळें साहजिक चालू सालचे देवघेवींत बरीच वाढ झाली आहे. गतसालीं कर्जें, कॅशक्रेडिट्स, वगैरे एकूण येणें रु. ११,६६,८७० होतें. सालअखेरीस एकूण येणें रु. १३,२७,३९१ इतकें आहे. गुदस्तसालीं बँकेस रुपये ३९,०३,६२५ नफा झाला होता. अहवालसालीं बँकेस रु. ४३,५८६-७९ इतका नफा झाला आहे. ६½% डिव्हिडंडला ८,३५५ रु. लागतील.

## पुणें जिल्हा सहकारी बोर्ड लि. पुणें

मुंबई राज्य सहकारी युनियनच्या वतीनें शेतकी पत-पुरवठा संस्था व विविध कार्यकारी संस्था यांचेकरितां ठेवण्यांत आलेल्या स्पर्धेत पुणें जिल्ह्यांत तिसऱ्या क्रमाकांचें पारितोषिक मिळविणाऱ्या बेलसर निळुंज विविध कार्यकारी सहकारी सोसायटी या संस्थेला पारितोषिक देण्याचा समारंभ माननीय य. बा. सावंत, इनामदार, चेअरमन पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें यांचे हस्तें गुरुवार दि. १७ सप्टेंबर १९५९ या दिवशीं दुपारीं ३-३० वाजतां सासवड येथें पुणें सें. को. बँक लि. सासवडच्या सभागृहांत झाला.

## सातारा जि. को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि., कराड.

# नोटीस

सातारा जिल्हा को-ऑ. लँड मॉर्गेज बँक लि., कराड-सांगलीची २४ वी वार्षिक साधारण सभा बुधवार तारीख ३० सप्टेंबर १९५९ रोजीं दुपारीं २ वाजतां कराड येथें बँकेच्या ऑफीसमध्यें भरणार आहे. त्या वेळचीं कामें :—

मागील सभेचें प्रोसिडिंग वाचून कायम करणें, इ. स. १९५८-५९ चा अहवाल, ताळेबंद व नफातोटापत्रक मंजूर करणें व डिव्हिडंड जाहीर करणें, इ. स. १९५९-६० सालाकरितां अंदाजपत्रक तयार करणें, इत्यादि कामें होणार आहेत. तरी 'अ' वर्ग कर्जदार व बिगर कर्जदार सभासदांनीं सभेस अगत्य यावें अशी विनंती आहे.

कराड, नीळकंठराव अण्णाप्पा कल्याणी,
ता. ३१-८-१९५९ चेअरमन

## दि बॉंबे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि.

चेअरमन : आर. जी. सरय्या
मॅ. डायरेक्टर : जी. एम्. लाड
मॅनेजर : वाय. बी. गायतोंडे

बँकेला चालू सालचा निव्वळ नफा रु. ९,५८,६२१ इतका झाला. मागील सालची पुढें ओढलेली रक्कम रु. १२,५५९ मिळविल्यावर वाटणीसाठी रु. ९,७१,१८० इतकी रक्कम होते. १½ लक्ष रुपये गंगाजळींत वर्ग करण्यांत येतील व १,६०,००० रु. चा नोकरवर्गास बोनस दिला जाईल. ५% डिव्हिडंडसाठी ६,४०,००० रु. लागतील. ह्या बँकेच्या ठेवींत रु. ३·४५ कोटीनें वाढ होऊन, ठेवी रु. १७·२० कोटी झाल्या व एकूण खेळतें भांडवल रु. २९·६७ कोटी झालें. गेल्या सालीं हें रु. २४·४७ कोटी होतें. बँकेच्या कार्यक्षेत्रांतील सहकारी चळवळीच्या वाढत्या व्याप्तीचें हें द्योतक आहे.

सालमजकुरीं ठाणें व रत्नागिरी येथील दोन जिल्हा बँकांनीं त्यांचे व्यवहारास सुरुवात केली व तीन बँकांनीं त्यांच्या कार्यक्षेत्रांत वाढ केली. वरील बँकांकडे व्यवहार वर्ग केल्यानें २४ शाखा बंद करण्यांत आल्या. सिहोरी (जिल्हा बनासकांठा), राहुरी कारखाना (जिल्हा नगर), खेडब्रह्म व इदार (जिल्हा साबरकांठा) व भायखळा (मुंबई उपनगर) अशा ५ नवीन शाखा उघडण्यांत आल्या. वर्षअखेर एकूण २५ शाखा राहिल्या. गेल्या सालअखेर एकूण शाखा ४४ होत्या.

चालू सालीं सहकारी संस्थांकडील कर्जमागणींत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली व त्यामुळें बँकेस संलग्न असलेल्या सहकारी संस्थांना वाढत्या प्रमाणावर कर्जपुरवठा करावा लागला व त्याकरितां बँकेस स्वतःकरितां, रिझर्व्ह बँकेकडून रु. १·९० कोटी कर्ज काढावें लागलें. सदर रक्कम ३०-६-५९चे आंत फेड करण्यांत आली. मध्यवर्ती संस्थांकरितां चालू सालीं जास्तींत जास्त रु. ८·७५ कोटी कर्ज काढलें. गुदस्त सालीं ही रक्कम रु. ५·७९ कोटी होती. सालअखेर त्याबाबतचें देणें रु. ७·४२ कोटी राहिलें. गुदस्त सालअखेर हें देणें रु. ५·२५ कोटी होतें.

एकूण दिलेल्या कर्जांची येणें बाकी सालअखेर रु. १५·७६ कोटी होती. ही रक्कम गेल्या सालीं रु. १४·९५ कोटी होती. पैकीं रिझर्व्ह बँकेकडून कर्ज काढून मध्यवर्ती सहकारी बँकांना दिलेल्या फेरकर्जापैकी येणें रु. ७·४२ कोटी व ५·२५ कोटी, चालू सालअखेर व गेले सालअखेर याप्रमाणें होतें. वरील कर्जापैकी हंगामी शेती कारणासाठी काढलेल्या कर्जात रु. १·८२ कोटी वाढ झाली. ह्याचें कारण बहुंशीं बँकेच्या शाखांमार्फत होणारा कर्जाचा व्यवहार मध्यवर्ती सहकारी बँकांकडे वर्ग झाला हें होय. ह्याच कारणामुळें बँकेचे सहकारी सोसायट्यांकडून शेतीविषयक कर्जाचें येणें रु. १·४६ कोटीनें कमी होऊन तें रु. १·०१ कोटी राहिलें. मध्यवर्ती बँका व सहकारी ग्रामीण संस्था यांचेकडील येण्याव्यतिरिक्त इतर सहकारी संस्थांकडून येणें ३० जून, १९५९ अखेर गेल्या वर्षअखेरपेक्षां रु. १४ लाखांनीं जास्त म्हणजे, रु. ७·१८ कोटी इतकें राहिलें. पैकीं सहकारी साखर कारखान्यांकडून येणें रु. ५·४६ कोटी होतें. इन्डस्ट्रियल फायनॅन्स कॉर्पोरेशनकडून मिळणाऱ्या कर्जापोटीं ६ कारखान्यांना एकूण रु. १·११ कोटी कॅश क्रेडिटस मंजूर करण्यांत आलीं, व १० कारखान्यांना मशिनरी उभारणी व सुधारणा करण्याकरितां सरकारी हमीवर रु. १·०६ कोटीचीं मध्यम मुदतीचीं कर्जें मंजूर करण्यांत आलीं. तसेंच ११ कारखान्यांना उत्पादन खर्चाकरितां रु. ५·६४ कोटी मंजूर करण्यांत आले. कारखान्यांनीं यंत्रसामुग्रीच्या खरेदीपोटीं पुढील हप्त्याबाबत द्यावयाच्या रु. १·९२ कोटी रकमेस ह्या बँकेची हमी असून त्यांपैकी रु. १·९१ कोटी रकमेस सरकारी हमी आहे.

सरकारी व विश्वस्त रोख्यांत गुंतवलेल्या रकमेंत वर्षअखेर रु. ५५ लाखांनीं वाढ होऊन, सदर गुंतवणूक रु. ७·१२ कोटी इतकी राहिली. खरेदी किंमतीपेक्षा बाजारभाव किंमत व दर्शनी किंमत अनुक्रमें रु. ७ लाख व रु. २१ लाखांनीं जास्त होती. ह्या कारणामुळें, इन्व्हेस्टमेंट रिझर्व्ह रु. ९·१० लाख आहे, त्यांत जादा तरतुदीची जरूर नाहीं असें संचालक मंडळाचें मत आहे. अहवालाचे सालांत रु. १३,८८६ इतक्या रकमेची संशयित कर्जे, संशयित कर्जनिधींतून खर्ची टाकण्यांत आलीं. इतक्याच रकमेची फेर तरतूद केल्यामुळें संशयित कर्जनिधि, वर्षअखेर रु. १० लाख राहिला. व्याज थकबाकी रिझर्व्ह सालमजकुरीं फेरफार न होतां रु. १·८५ लाख इतका राहिला. मात्र प्रत्यक्ष व्याज थकबाकींत रु. ०·५१ लाखांनीं घट होऊन, सदर थकबाकी रु. १·२७ लाख राहिली.

गेल्या सालीं, सहकारी संस्थांस, सरकारनें ह्या बँकेमार्फत द्यावयाच्या शेअर भांडवलाबाबतच्या अटी ठरविण्यांत आल्यामुळें मुंबई राज्य सरकारनें मध्यवर्ती संस्थांकरितां रु. ५२ लाख व ग्रामीण सहकारी संस्था यांचेकरितां रु. ४७ लाख बँकेकडे दिले.

१९५६-५७ सालांत संचालक मंडळानें, प्रत्येक जिल्ह्यांत १९६०-६१ सालअखेर एक मध्यवर्ती सहकारी कर्ज पुरविणारी संस्था असावी असें ठरविलें होतें. प्रत्यक्ष हातीं घेतलेल्या कार्यावरून हें उद्दिष्ट चालू सालअखेर, डांग जिल्हा वगळतां, गांठतां येईल असें वाटतें. राज्यांत असलेल्या निरनिराळ्या अॅपेक्स बँकांच्या एकीकरणाच्या प्रश्नावर राज्य सरकारचा विचार चालू आहे. सर्व राज्याकरितां एकसूत्रित सहकारी कायद्याबाबतचे विधेयक लौकरच विधानसभेंत येईल अशी आशा वाटते.

---

### ला. इं. कॉर्पोरेशनची नाशिक कचेरी

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनच्या नाशिक डिव्हिजनल कचेरीच्या नव्या इमारतीचें उद्घाटन १२ सप्टेंबर रोजीं कॉर्पोरेशनचे चेअरमन, श्री. गोपालकृष्ण, ह्यांनीं केलें. पूर्वीच्या सह्याद्रि विमा कंपनीनें ह्या इमारतीची पूर्वतयारी केली होती. कॉर्पोरेशननें ४·५ लक्ष रु. खर्चून इमारत पुरी केली. सह्याद्रि विमा कंपनीचे पूर्वीचे व्हाइस चेअरमन श्री. दीक्षित ह्यांनीं पाहुण्यांचें स्वागत केलें. डिव्हिजनल मॅनेजर श्री. सौंदणकर ह्यांनीं नाशिक डिव्हिजननें केलेली प्रगति निवेदन केली.

---

### भाक्रा धरणाच्या अपघाताचा वीजपुरवठ्यावर परिणाम

दिल्ली शहराला १९६० चे अखेरीस जादा ४०,००० कि. वॅ. विजेचा पुरवठा मिळणार होता. पण भाक्रा धरणाच्या अपघातामुळें तो पुरवठा मिळण्यास आणखी निदान सहा महिने लागतील.

---

**अन्नपदार्थांमधील भेसळीचें प्रमाण**—कलकत्ता कॉर्पोरेशनच्या आरोग्यखात्यानें शहरांतील अन्नपदार्थांच्या भेसळीविरुद्ध मोहीम सुरू केली आहे. बाजारांत विकल्या जाणाऱ्या ८३ खाद्य पदार्थांचे नमुने संबंधित अधिकाऱ्यांनीं ताब्यांत घेतले आणि ते रासायनिक पृथक्करणासाठी पाठविले. त्यांपैकी ५० टक्क्यांपेक्षा अधिक पदार्थ भेसळ केलेले आढळले.

## घरगुती जोडधंद्याचें प्रचंड कारखान्यांत रूपांतर

### 'साठे बिस्किटांचा' कारखाना

अकालीं वैधव्य, पदरीं पांच मुलें, अशा परिस्थितींत कोणतीहि स्त्री हताशच होणार. त्यांत दारिद्र्य. अशाहि परिस्थितींत धीमेपणानें आपली जबाबदारी पार पाडीत धैर्यानें प्रतिकूल परिस्थितीला टक्कर देत आपली प्रगति करून घेणारी व स्वतःच्या मुलांचा सांभाळ उत्कृष्ट रीतीनें करणारी एक धीराची स्त्री म्हणूनच श्रीमती सीताबाई साठे यांचा उल्लेख करावा लागेल. स्वतःच्या संसाराला जरूर तो पैसा उभा करण्यासाठी या बाईंनीं एक साधा उपाय योजला. घरोघरीं बायका अधून मधून बिस्किटें करतातच. हींच बिस्किटें आपल्या स्वयंपाकघरांतच तयार करून परिचितांत त्यांची विक्री व प्रसार करावा असें या बाईच्या मनांत आलें व लगेच त्यांनीं त्या दिशेनें पावलें टाकण्यास सुरुवात केली. हाच आज सर्वांच्या तोंडीं असलेल्या 'साठे बिस्किटां'चा प्रारंभ.

साठे बिस्किट अँण्ड चाकोलेट कं. लि. ची सुरुवात ही वर दिलेल्या कारुण्यपूर्ण घटनेंतून झाली व आज या धंद्याचा विस्तार, प्रसार व प्रतिष्ठा हें सबंध महाराष्ट्राचें भूषण ठरलें आहे.

### स्वयंपाकापासून यंत्रापर्यंत

सन १९१९-२० सालीं श्री. सीताबाईंनीं घरांत बिस्किटें करून तीं घरोघरीं विकण्यास सुरुवात केली. सुरवातीला तीं जेमतेम दर दिवशीं दोन पौंड होत. त्या वेळीं दर पौंडाला पांच ते सहा आणे पडत; म्हणजे दिवसाला खर्चवेंच जाऊन चारसहा आणेच फायदा राहात असेल. थोरला मुलगा श्री. ग. रा. ऊर्फ बाबूराव हे मिलिटरी अकौंटस खात्यांत दरमहा सुमारें ४०-५० रुपयांवर नोकरी करीत. हळूहळू या घरगुती बिस्किटांचा प्रसार होत होत १९२५ पर्यंत रोज ५० पौंड बिस्किटें तयार होऊं लागलीं. निर्माण झालेली मागणी भागवणें केवळ स्वयंपाक घरांतून काम करून भागण्यासारखें नव्हतें म्हणून परदेशाहून कांहीं हस्तचलित यंत्रें मागवून त्यांच्या साह्यानें काम सुरू झालें. हींच यंत्रें विजेच्या साह्यानें चालू होतांच दररोजचें उत्पादन १५० पौंडांपर्यंत गेलें. या काळांत श्री. बाबूराव यांनीं नोकरी सोडून मातोश्रींचा धंदा पाहण्यास सुरुवात केली. पुढें प्रगति झपाट्यानें होत गेली व धंद्याच्या वाढीचे विचार बाबुराव यांचे डोक्यांत घोळूं लागले. योगायोग असा कीं, त्याच वेळीं पुण्यांत चालू असलेला बिस्किटांचा एक यांत्रिक कारखाना बंद पडला होता व त्याचीं यंत्रें गंजत पडलीं होतीं. हीं यंत्रें मिळविण्याच्या खटपटीस बाबूराव लागले व त्यांत त्यांना यश आलें. पदरीं भांडवल नव्हतें; परंतु हा व्यवहार सोईस्कर अटींनें व सवडीनें पुरा करतां आला. या कामीं कै. बॅ. गाडगीळ यांचें साह्य झालें याचा उल्लेख बाबूराव कृतज्ञतापूर्वक करतात.

### पसारा वाढूं लागला

बिस्किटांची यांत्रिक निर्मिति एकीकडे सुरू झाली तर याच काळांत ठिकठिकाणीं भरलेल्या स्वदेशी प्रदर्शनांतून 'साठे बिस्किटां'चा गौरव होऊन पारितोषिकें मिळूं लागलीं.

नॅझरेथ कंपनीच्या या यांत्रिक कारखान्याची उत्पादनशक्ति दररोज १५०० पौंड होती. हें लक्ष्य गांठण्यास जागा अपुरी पडूं लागली. पुष्कळ शोध व खटपट करून भवानी पेठेंतील जागेंत कारखाना शक्य तितक्या आधुनिक सोईंनीं सुसज्ज ठेवून सुरू केला, त्या वेळीं ही जागा पुढें पंचवीस वर्षपर्यंत होऊं शकणाऱ्या वाढीला पुरेल अशी कल्पना होती.

### परदेशांचा दौरा

थोड्याच अवधींत असें आढळून आलें कीं, आपली साधनसामुग्री अपुरी पडूं लागली व जुनीं यंत्रेंहि तितकेसें समाधानकारक काम देईनात. मागणी पुरविणेंच मुष्कील झालें. त्यासाठी १९३९ सालीं श्री. बाबुराव इंग्लंड, जर्मनी व युरोपांतील कांहीं देशांना भेट देऊन आले. एक सामान्य पाहुणा म्हणून त्यांचें सर्वत्र चांगलें स्वागत झालें. जिज्ञासू म्हणून त्यांना आपल्या धंद्याची कांहीं माहितीहि गोळा करतां आली. पण पुढें ठवकरच हा पाहुणा स्वतःच एक बिस्किट कारखानदार आहे हें लक्षांत येतांच वृत्ति एकदम पालटली व अगत्याची जागा औपचारिकपणानें घेतली! हा अनुभव रिडिंग येथील प्रसिद्ध हंटले पामरचा कारखाना पाहतांना जाणवण्याइतका झाला. परंतु जरूर ती माहिती हिकमतीनें घेऊन व नवीन यंत्रसामुग्रीची ऑर्डर जर्मनींत देऊन ते मायदेशीं परतले.

मायभूमीस परत येतांच अवघ्या एक महिन्यांत दुसरें महायुद्ध सुरू झालें व ही यंत्रसामुग्री आलींच नाहीं. युद्धामुळें परदेशांतून आयात कमी झाली. मागणी वाढूं लागली. त्यांतच लष्करी खात्याची कोकोची एक मोठी ऑर्डर मिळाली. यामुळें कोको व चॉकलेटचें उत्पादन सुरू झालें. प्रयोग करीत, अनुभव घेत घेत, याहि शाखेंत कारखान्यानें चांगली प्रगति केली. युद्धानंतर बाबूराव साठे यांनीं अमेरिका, इंग्लंड इ. देशांतून दोन तीन वेळ प्रवास करून नवीन यंत्रसामुग्री आणवून आपल्या धंद्याची अगदीं आधुनिक पद्धतीनें उभारणी केली.

पुण्यापासून ५ मैलांवर धानोरी या खेड्यांत २७ एकर जागा, नवीन टुमदार इमारत, अद्यावत् यंत्रसामुग्री, कामगारांसाठी वसाहत, इत्यादि योजना बहुतेक पुऱ्या होत आल्या आहेत. स्वयंपाकघरांत सुरू झालेल्या या साध्या खटपटीचें रूपांतर आज एका अभिमानास्पद उद्योगांत कसें व किती झालें आहे हें पुढील कांहीं आंकड्यांवरून दिसून येईल.

१ एप्रिल, १९४९ रोजीं याचें रूपांतर समाईक भांडवलाच्या लिमिटेड कंपनींत झालें.

आज या कारखान्यांत सात प्रकारचीं एकूण ४ टन बिस्किटें रोज तयार होतात. रोज अर्धा टन चॉकलेट बनतें. कारखान्याची शक्ति रोज ५ टन बिस्किटें व १ टन चॉकलेट करण्याइतकी आहे. १५० कामगार आहेत. १४ लक्ष, ८३ हजार रुपये शेअर भांडवल आहे. साडे आठ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत. जमीनजुमला, इमारती, यंत्रें, इत्यादि मध्यें ३० लक्ष रुपये गुंतवले आहेत. वार्षिक विक्री चाळीस लक्ष रु. इतकी आहे. गतवर्षी भागीदारांना ६ ते ७% डिव्हिडंड वाटण्यांत आलें आहे.

### उज्ज्वल भवितव्य

हें यश म्हणजे श्रीमती सीताबाई साठे यांची धीरगंभीर वृत्ति व निर्धार व त्यांचे चिरंजीव श्री. बाबूराव व त्यांच्या इतर भावांची चिकाटी, सतत परिश्रम, अबोल व निगर्वी स्वभाव, सचोटी व दिलदार वागणूक या कारणांनीं पदरांत पडलें आहे. आज मातोश्रींचें वय ७७ व बाबूराव यांचें ६० चे वर आहे. त्यांचे दोन बंधु श्री. दत्तोपंत व नारायणराव हे निरनिराळ्या खात्यांचीं कामें पाहतात. श्री. बाबुराव व दत्तोपंत यांचे मुलगे अमेरिकेस जाऊन उच्च शिक्षण घेऊन तेथील कारखान्यांतून प्रत्यक्ष काम करून अनुभव घेऊन आले असून ते दोघेहि बिस्किटें व चॉकलेटकोको या दोन उत्पादन शाखा स्वतंत्रपणें सांभाळतात.

## छोटे कारखाने व कारखानदार ह्यांचें महत्त्व

### सारस्वत बँकेचे चेअरमन, श्री. वर्दे, ह्यांचा आढावा

दि सारस्वत को. बँकेची प्रगति भक्कम पायावर आणि वेगानेंहि चालू आहे. बँकेचें खेळतें भांडवल आतां २२५ लक्ष रु. झालें आहे. ठेवींची रक्कम २०० लक्ष रुपयांवर गेली आहे आणि कर्जांतहि १० लक्ष रुपयांची वाढ होऊन ती ६६ लक्ष रु. ची झाली आहेत. ठेवींच्या ७५% रक्कम तरत्या स्वरूपांत म्हणजे रोख, बँकांत खात्यावर आणि रोख्यांत आहे. गेल्या वर्षी बँकेस ७·४६ लक्ष एकूण उत्पन्न होऊन १·०३ लक्ष रु. निव्वळ नफा झाला.

बँकेच्या ४१ व्या वार्षिक साधारण सभेंत भाषण करतांना, चेअरमन श्री. वा. पुं. वर्दे, ह्यांनीं प्रथम हिंदी आर्थिक परिस्थितीचा आढावा घेतला आणि किंमतीच्या चढीच्या प्रवृत्तीबद्दल चिंता व्यक्त केली. अन्नधान्याचें उत्पादन दरसाल ८·२% तरी वाढल्याखेरीज महागाई आटोक्यांत रहाणार नाहीं, असें त्यांनीं सांगितलें. अन्नपुरवठ्याची समाधानकारक वांटणी होऊन आणि उत्पादन खर्च कमी होऊन निर्गतीस वाव उरण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादन केली. श्री. वर्दे ह्यांनीं गेल्या वर्षातील बँकिंगचाहि आढावा घेतला. बँकांकडे पूर्वीप्रमाणेंच ठेवी येत राहिल्या, पण त्या गुंतविण्यास नवे मार्ग उपलब्ध झाले नाहींत. अशा परिस्थितींत, रिझर्व्ह बँकेच्या कर्जविषयक धोरणास सक्रिय पाठिंबा बिनतक्रार देणें भागच पडलें आणि महत्त्वाच्या, मोठ्या बँकांनीं ठेवीवरील व्याजाचे दर १ ऑक्टोबर, १९५८ पासून आपण होऊन उतरविले. गेल्या वर्षी शेड्यूल्ड बँकांकडील ठेवींत २३४ कोटी रुपयांची वाढ झाली; त्यांची गुंतवणूक १४९ कोटी रु. नीं व कर्जें ८१ कोटी रुपयांनीं वाढली. बँकांजवळ पैसा पडून राहूं लागला, तशीं त्यांपैकी कांहींनीं आपल्या गिऱ्हाइकांना नवे जिन्नस विकत घेऊन रहाणीचा दर्जा वाढविण्यास प्रोत्साहन देण्यासाठीं 'कंझ्यूमर क्रेडिट' सुलभ करण्याचा उपक्रम केला. भारतांत आर्थिक विकासाला पैसा अपुरा पडत असतांना,उपभोग्य जिनसांच्या वापरासाठी प्रोत्साहन देणें राष्ट्रीय हिताचें नाहीं, असें श्री. वर्दे ह्यांनीं स्पष्ट सांगितलें आणि बँकांजवळील शिलकी पैसा योग्य कारणीं लावण्यासाठी कुठलीहि योजना स्वागतार्हच ठरेल असें ते म्हणाले.

हिंदी बँकांची आजवरची वाढ एक्सचेंज बँकांच्या परंपरेंत झाली; व्यापार आणि मोठे उद्योगधंदे ह्यांना कर्जपुरवठा करण्याचें त्यांना माहीत. बँकांच्या कारभाराच्या वाढत्या खर्चामुळें नफ्यास कूस कमी उरायला लागली आणि ठेवींचा किफायतशीर वापर करणें अशक्य होऊं लागलें, त्यामुळें बँकांना अधिक जागरूक होणें भागच पडलें आहे. भारतांतील तीन चतुर्थांश आर्थिक उलाढालींना कर्जपुरवठा सावकारांमार्फत होतो, तेव्हां बँकांना अद्याप केवढें तरी क्षेत्र मोकळें आहे. लहान कारखाने व छोटे कारखानदार ह्यांच्याकडे बँका अद्याप लक्ष पुरवूं लागलेल्या नाहींत. लहान उद्योगांना भांडवल लागतें त्यामानानें त्यांत रोजगार ज्यास्त प्रमाणांत उपलब्ध होतो, ह्या दृष्टीनें अशा उद्योगांचें महत्त्व आतां वाढत आहे. म्हणून, बँकांनीं आपल्या धोरणाला इष्ट ती मुरड घालणें आवश्यक आहे. हैदराबाद येथें रिझर्व्ह बँकेमार्फत भरलेल्या बँकर्सच्या परिषदेनें ह्या बाबतींत योग्य मार्गदर्शन केलेलेंच आहे. सारस्वत बँक आपल्या छोट्या कारखानदार—सभासदांच्या भांडवलविषयक गरजा भागविण्याचे कामीं उत्कृष्ट कामगिरी करीत आहे, हें बँकेच्या अहवालावरून दिसून येतें.

५० | वर्षापेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखकः—श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.




सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना : १९१८ | सारस्वत बँक गृह, मुंबई ४. | टेलिफोन : २७०१४
बँकेचे सभासद आणि ठेवीदार यांच्या सोईसाठी
आमच्या वरळी, दादर आणि पुणें शाखेंत माफक दरांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय करण्यांत आली आहे.
सविस्तर माहिती शाखाधिकाऱ्यांकडे मिळेल.
शाखा : फोर्ट, दादर, माहिम, वरळी, पुणें, बेळगांव.
महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, गिरगांव मुंबई ४.

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : १४८३.

## सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | २½ टक्के |
| २ वर्षें | : | २¾ टक्के |
| ३ वर्षें | : | ३ टक्के |
| ५ वर्षें | : | ३½ टक्के |
| १० वर्षें | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवीचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ११-७-५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१.
( स्थापना : १९११ )
चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

मरपाई झालेलें भाग भांडवल :
भागीदारांतर्फे रु. ४४ लक्ष
मुंबई सरकारतर्फे रु. ८१ लक्ष
रु. १ कोटी, २५ लक्ष

गंगाजळी व इतर फंड : रु. ५३ लक्ष
एकूण ठेवी : रु. १२ कोटी
खेळतें भांडवल : रु. २४ कोटींचे वर

१० जिल्ह्यांमध्यें व मुंबई उपनगरांत मिळून ४३ शाखा

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था. सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.

स्थापना १९३६

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस :
पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई, गिरगांव, ३ मुंबई, दादर, ४. नासिक, ५. पुणें, ६. बार्शी, ७. लोणंद, ८. कोल्हापूर, ९. हलकर्णी, १०. इचलकरंजी, ११. फलटण.

| | | ३० जून, १९५९ अखेर |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ४,७५,००० |
| ठेवी | रु. | १,६८,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,९५,००,००० |

मुदत ठेवींवरील व्याज :

| १ वर्ष ते २ वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें | दहा वर्षें |
|---|---|---|---|
| रु. ३·०० | रु. ३·१५ | रु. ३·५० | रु. ४·०० |

रु. एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

दराबाबत चौकशी करावी.

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १·०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | १·५० |
| चालू डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | ०·५० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जन. मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

नेहमींच प्रगतिपर व सुरक्षित

# दि बेळगांव बँक लिमिटेड

बेळगांव
( शेड्यूल्ड बँक )
स्थापना १९३०

★ नियमित बचत केल्यानें कुटुंबाची व राष्ट्राची शक्ति वाढीस लागते.

★ कुटुंबांतील मंगलकार्यें, उच्चशिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठी नियमित बचत करणें अगत्याचें ठरतें.

★ बेळगांव बँकेंत क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटचें वा होम-सेव्हिंग्जचें खातें उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येते.

व्याजाचे आकर्षक दर.

आपल्या सव्वीस शाखांतून सेवावृत्तीनें व्यापार व बचत यांची नेहमींच वाढ करीत असलेली

दि बेळगांव बँक लिमिटेड.

एच्. एस्. कुलकर्णी
जनरल मॅनेजर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.